माहितीचा
अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/१६४/२०१८
दि.०२/११/२०१८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.कृष्णा सी. गुप्ता, ...............अपिलार्थी
एस-१०६, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
जनार्दन रकवी मार्ग, उत्तन रोड,
भाईंदर (प.), जि.ठाणे ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ...............प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.कृष्णा सी. गुप्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.२०/०८/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

मी दिनांक ०३/०८/२०१८ रोजी आपल्या नावाने आपल्या कार्यालयात बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याकरिता लेखी पत्र दिले असुन त्या पत्रावर खालील मुद्दांप्रमाणे माहिती देण्यात यावी.

१) माझ्या पत्राची Inward झालेली व त्यावर असलेले टिप्पणीच्या सत्यप्रत देण्यात यावी.
२) आपण केलेल्या कार्यवाहीचा तपशील देण्यात यावा.
३) माझे पत्र आता कोणत्या विभागात पडलेल्या आहेत त्या विभागाचे नाव व अधिकाऱ्याचे नाव देण्यात यावे.(Copy of letter enclosed)
४) आपल्या कार्यालयातून निर्गमित आदेशाची प्रत दयावीत.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत दि.२०/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिली नसल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.२२/१०/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०२/११/२०१८ रोजी दुपारी १२.५५ वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/ उपआ.आस्था/४०९/२०१८ दि.२५/१०/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) हे व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माहिती अधिकार अंतर्गत मला माहिती दिली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

-: **निर्णय** :-

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी विहित मुदतीत माहिती दिलेली नाही. सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी १५ दिवसांत अपिलार्थी अर्जदारास माहिती विनाशुल्क पुरवावी. तसेच यानंतर माहिती अधिकारावरील प्रत्येक अर्जावर विहित वेळेत दक्षता घेण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.कृष्णा सी. गुप्ता,
एस-१०६, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
जनार्दन रकवी मार्ग, उत्तन रोड,
भाईंदर (प.), जि.ठाणे ४०११०१.

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.